यशवंत ग्रामपंचायत पुरस्कार प्राप्त

निर्मल ग्राम

## ग्रामपंचायत वरणगे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

# मानपत्र

## महावीर कॉलेज, कोल्हापूर.

### राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान शिबिर २०२०

भारत देशाच्या भावी राष्ट्र घडविणेचे स्वप्न बाळगुन तरुण पिढिला राष्ट्र जडणघडणेत पाया रचनेच्या कार्यात आपल्या महावीर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थींनी वरणगे गावी प्रबोधन आणि दिशा देणारे कार्य हाती घेतले.

कोल्हापूर जिल्ह्याची प्रमुख जलस्त्रोत पंचगंगा नदी प्रदुषणाच्या विळख्यात अडकली आहे. तिला प्रदुषण मुक्त करणेसाठी गावातील निर्माण होणारे सांडपाणी शोषखड्यामध्ये निचरा करणेचे प्रायोगिक कामे यशस्वी केली.

ग्रामीण भागातील महिलांना घराच्या चौकटी बाहेर आणून त्यांना लघु उद्योगाचे महत्व सांगून अंगी असलेला पाक कौशल्याचा वापर करुन व्यवसाय करणेची प्रेरणा दिलीत. गावात 'फूड फेस्टिव्हल' आयोजन करुन महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहून स्वहिमतीवर पैसे मिळवण्याची प्रेरणा व धमक निर्माण केलीत.

गावची स्वच्छता, वृक्ष संवर्धन, गाव तलाव सुशोभिकरण, जलस्त्रोताचे संवर्धन, श्रमदानातून रस्ते अशी अनेक कामे श्रमदानातून पुर्ण केलीत.

सदर शिबिरार्थी सोबत त्यांचे मार्गदर्शक प्रा.डॉ.श्री.गोपाळ गावडे, प्रा.श्री.रविदास पाडवी, प्रा.श्री.जावेद मिस्त्री, प्रा.श्री.अंकुश बनसोडे व प्राचार्य डॉ.श्री.आर.पी.लोखंडे तसेच १४० शिबिरार्थी यांनी अतुलनिय योगदान दिले.

आपण या शिबिराच्या माध्यमातून केलेली कामगीरी गौरवास्पद असुन त्याबद्दल आपणास हे 'मानपत्र' देऊन सन्मानित करणेत येत आहे.

आपले,

| श्री. आर. डी. कुंभार | सौ. भारती राजाराम कनोजे | सौ. अपर्णा अमित पाटील |
|---|---|---|
| ग्रामविकास अधिकारी | उपसरपंच | सरपंच |

सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ वरणगे

CS Scanned with